
# बदलून गेला गणपत...

जगदिशपूर हे एक सामान्य खेडेगाव ते आदर्श गाव कसे बनले याची ही गोष्ट आहे.




भाग ३

आत्तापर्यंत तुम्ही वाचले की समीर नावाच्या तरूणाने जगदिशपूरमधील अज्ञान व पुराणमतवादीपणा नष्ट करायचा विडा कसा उचलला होता. अणुशक्तीबाबत लोकांचे असलेले गैरसमज व भिती दूर करण्याकरता त्याने गणपत, रघुकाका, गंगुताई व लक्ष्मीताई या खेड्यातील इतर रहिवाश्यांकरता तारापूरमधील अणुवीज केंद्राला भेट देण्याचा कार्यक्रम आखला. या भेटीनंतर गणपत, रघुकाका, गंगुताई व लक्ष्मीताई यांच्या मनातील बऱ्याच शंका दूर झाल्या व त्यांच्या मनात उत्साह व अणुशक्तीबद्दल आवड निर्माण झाली आणि आपल्या गावाच्या विकासाचे चित्र त्यांच्या डोळ्यासमोर दिसू लागले.

आता बघूया की जगदिशपूर गाव बदलू शकले का? या गावाची प्रगती व भरभराट झाली का? शेवटी गणपत व त्याच्या इतर गावकरी मित्रांमध्ये बदल घडला का?

चला, आपणही या अनोख्या बदलाचा आनंद घेऊ या!




तारापूर अणुवीज केंद्राला भेट देऊन आल्यानंतर समीर आणि सर्व रहिवासी मिळून गावप्रमुखाच्या घरी गेले.
"रामराम सरपंच"
रामराम! या बसा सगळे जण, कशी झाली तुमची भेट? तारापूरमधल्या अणुवीज केंद्राला भेट देऊन आल्यावर तुम्हाला कसे वाटले? तुमचे आनंदी चेहरे सांगत आहेत की तुम्हाला खरच खूप मजा आली. हो ना गणपत?
होय सरपंच. आम्हाला खरंच खूप मजा आली. शिवाय आम्हाला अशा काही गोष्टी पहायला मिळाल्या, ज्या कदाचित या जन्मात आम्हाला पहायला मिळाल्या नसत्या".
होय साहेब, हे सर्व आपल्या समीरमुळे शक्य झाले.... जर त्याने आम्हाला तिथे नेले नसते तर आम्हाला अण्विक उर्जेचे फायदे कधीच समजले नसते.
अगदी खरे आहे. आण्विक प्रकल्पाच्या आजूबाजूचा परिसर इतका हिरवागार आणि सुंदर होता की आम्हाला तिथून परत यावेसेच वाटत नव्हते.


होय साहेब....आणि आम्हाला विकास म्हणजे काय? गाव कसे प्रगती करू शकते? खेड्यातील रहिवाश्यांची जीवनशैली कशी बदलता येते... हे कधीच समजले नसते. आम्हाला हे सर्व पहायची संधी मिळाली... त्याकरता आपल्या समीरला धन्यवाद दिले पाहिजेत.
नाही नाही मावशी... उलट मीच तुमच्या सर्वांचे आभार मानले पाहिजेत कारण तुम्ही सर्वांनी खुल्या मनान माझे म्हणणे ऐकले आणि अणुवीज केंद्राला भेट द्यायला येण्याचे मान्य केले.
खरं सांगतो... मला आज तुमच्या सर्वांपेक्षा जास्त आनंद झाला आहे... आता मला सांगा तुम्ही सर्व जण तुमच्या गावाच्या भरभराटीसाठी आणि प्रगतीसाठी तयार आहात का?
हो हो. आम्ही सर्व जण तयार आहोत...
मग, आपल्या दावात अणुतक्की प्रतल्प उभारला दाईल ना?
होय निश्चितच! तुम्ही सर्व जण त्यासाठी तयार रहा. (हा... हा... हा...) पण समीर हे सारे कसे होणार?


होय... होय. हे सारे कसे होणार?
आता ते सारे माझ्यावर सोडून द्या. आजोबा, मागच्या वर्षीच सरकारने आपल्या तारापूर गावाच्या आसपासच्या जमिनीवर अणुवीज केंद्र उभा करायचा ठरवले होते. आपल्या गावाची जमीन अणुवीज केंद्र उभा करण्यासाठी अतिशय अनुकूल आहे. आपल्याला त्यांचे अधिकारी येईपर्यंत वाट पहावी लागेल.
"म्हणजे, ते येईपर्यंत काहीच होणार नाही का?"
"नाही काका, मी अणुवीज केंद्राच्या अधिकाऱ्यांशी बोलेन आणि त्यांना आपल्या गावाला भेट द्यायला सांगेन. पण त्याला जरा वेळ लागेल... तुम्ही सर्व जण आनंदात रहा... मी उद्या शहरात जाईन आणि काही दिवसांनी परत येईन... तो पर्यंत तुमच्या सर्वांचा मी निरोप घेतो".
"तुला आमचे आशीर्वाद, मुला!"
बरं तर आजोबा, आता मी निघतो... तुम्हाला लवकरच भेटेन.


दीर्घायुष्यी हो, मुला. (त्यानंतर समीर परत जातो व गावकरीआपल्या भविष्यातल्या गावाबद्दल स्वप्ने पहात आपापल्या घरी परततात).
काही दिवसांनंतर... ट्रींग ट्रींग... ट्रींग ट्रींग... ट्रींग ट्रींग
"अरे, कोण आहे? इतक्या सकाळी कोण फोन करत आहे?"
"हॅलो, आजोबा... नमस्कार. मी समीर बोलतोय. तुम्ही कसे आहात?"
"अरे समीर तू? आशीर्वाद मुला, मी अगदी व्यवस्थित आहे. पण मला सांग की तुझे सर्व कसेकाय चालले आहे?"
"इकडे सुध्दा सर्व व्यवस्थित आहे आजोबा. तुम्हाला एक आनंदाची बातमी सांगायची होती म्हणून फोन केला. मी माझी इंजिनिअरिंगची परीक्षा पास झालो आणि मला एका मोठ्या कंपनीत नोकरीही मिळत आहे."
"अरे वा, खरोखरच ही खूप छान बातमी आहे. आज जर तुझे आई-वडील जिवंत असते तर त्यांना तुझा नक्की अभिमान वाटला असता.
आजोबा, तुम्ही मला माझ्या आईवडीलांइतकेच जवळचे वाटता... अजून एक गोष्ट, पुढच्या आठवड्यात आण्विक उर्जा विभागातील अधिकारी आपल्या गावात अणुवीज केंद्राच्या पहाणीसाठी येणार आहेत. तुम्ही सगळे जण तयार रहा. शक्य असेल तर मी सुध्दा तेव्हा येईन".


"वा! ही सुध्दा छान बातमी आहे. मी आता लगेच सर्व गावकऱ्यांना ही माहिती देतो". "ठीक आहे आजोबा, आता मी तुमचा निरोप घेतो. मी जेव्हा तिथे येईन तेव्हा बोलू. बाय बाय आजोबा". "दीर्घायु हो मुला. तुला खूप आयुष्य लाभो".
(एका आठवड्यानंतर. सर्व गावकरी एकत्र जमले आहेत व एकत्र बसून एकमेकांशी चर्चा करत आहेत. तितक्यात ३–४ मोटारी येतात आणि तिथे थांबतात).
सगळ्यांना नमस्कार, आम्ही आण्विक ऊर्जा विभागातून आलो आहोत. सरकारने तुमच्या गावाच्या आजूबाजूच्या जमिनीवर अणुवीज केंद्र उभा करायचे ठरवले आहे. त्यासाठीच आम्ही सर्व जण इथे आलो आहोत."
"या ना साहेब. जगदिशपूर गावात आम्ही तुमच्या सर्वांचे स्वागत करतो. अरे, त्या खुर्च्या आणा रे. (ते सर्वजण खुर्च्यांवर बसतात).
"बरं साहेब, आम्हाला सांगता की आम्ही सर्व गावकरी तुम्हाला कशी मदत करू शकतो ते?"
"अ, हे पहा माझे नाव जीवनकुमार आहे आणि हे माझे सहकारी, प्रमोद सावरकर, किशोर आणि नवीन".
"सरपंच साहेब, बऱ्याच वर्षाच्या अभ्यासानंतर, आम्हाला असे आढळून आले आहे की तुमच्या गावाच्या आसपासचा परिसर अणुवीज केंद्र उभा करण्यासाठी अत्यंत योग्य आहे. भौगोलिक दृष्ट्या पहाता, इथे ना भूकंपाची भिती आहे ना त्सुनामीची! त्याशिवाय तुमच्या शेती व्यवसायावर त्याचा काही परिणाम होणार नाही कारण इथली जमीन तशी नापीकच आहे. सरकार ज्या लोकांची जमीन अणुवीज केंद्रासाठी घेईल तेव्हा त्यांना योग्य भरपाई देईल".


"सरपंच साहेब, अणुवीज केंद्र उभा करण्याबरोबरच तुमच्या गावाचा विकासही केला जाईल. पक्के रस्ते बांधले जातील, गटारांची व्यवस्था, पिण्याच्या पाण्याची सुव्यवस्था केली जाईल. शौचालये बांधली जातील. या सर्वांमुळे तुमचे आयुष्य अधिक चांगले होईल".
"होय. शिवाय तुमच्या गावातील नोकरी नसलेल्या सुशिक्षित तरूणांना नोकरी मिळण्याची संधी मिळेल व त्यांनी पूर्ण केलेल्या शिक्षणक्रमानुसार त्यांना नोकरी देण्यासाठी प्राधान्य दिले जाईल".
"या शिवाय तुमच्या गावाला व तुमच्या आसपासच्या सर्व खेडेगावांना पुरेशी वीज मिळेल ज्यामुळे तुमच्या शेतात जलसिंचनासाठी कूपनलिकांचा वापर करता येईल व त्यामुळे तुमचे धान्य उत्पादन मोठ्या प्रमाणावर होईल".
"होय. शिवाय मुलांसाठी शाळा उभारली जाईल आणि वैद्यकीय उपचारांसाठी एक रूग्णालयही बांधले जाईल व त्यामुळे या गोष्टींसाठी तुम्हाला शहरात जाण्याची गरज पडणार नाही".
"आम्हाला फक्त तुमच्या सर्वांचे सहकार्य हवे आहे ज्यामुळे आम्हाला लवकरांत लवकर काम सुरू करता येईल".


"आम्ही सर्व जण खरोखरचं नशीबवान आहोत. आम्ही सर्व गावकरी तुमच्या बरोबर आहोत. तुम्ही लवकरात लवकर काम सुरू करू शकता. तुम्हाला आमच्याकडून योग्य ते सर्व सहकार्य मिळेल आणि पुढच्या वेळी मी तुम्हाला माझ्या नातवाची समीरची पण ओळख करून देईन".
"कोण समीर ना? होय मला आठवतोय तो. त्यानेच आम्हा सर्वांना तुम्हाला भेटायला सांगीतले होते. माझ्या लक्षातच राहिल नाही ते".
बरं ते जाऊ दे. पुढच्या वेळी आम्ही त्याला नक्की भेटू. आता आम्ही निघतो. तुम्हाला परत भेटू. अच्छा". (त्यानंतर खेड्यातील माणसे व सरपंच आपापसांत चर्चा करतात).
(काही दिवसानंतर... गावकरी सरपंचाच्या घरी जमले आहेत. इतक्यात २–३ मोटारी गावात येऊन थांबलेल्या दिसतात व त्यातून काही माणसे उतरतात व ती सरपंचाच्या घरी येतात).
"रामराम सरपंच. कसे आहात तुम्ही?"
"अरे तुम्ही keÀmes Deenele? या ना आत. आम्ही सर्वजण एकदम ठीक आहोत".
"सरपंच साहेब, यावेळी तहसिलदारसुध्दा आमच्या बरोबर आले आहेत. ते तुमच्या जमिनींची पूर्ण माहिती घेतील. तुम्ही सर्वांनी तुमच्या जमिनींची पूर्ण माहिती त्यांना द्यावी ही विनंती".
"ठीक आहे. साहेब, मला थोडा वेळ द्याल का? मी इथल्या सर्व लोकांना बोलावून घेईन म्हणजे तुम्ही त्यांच्याकडून जमिनीबद्दलची पूर्ण माहिती घेऊ शकाल".
"ठीक आहे सरपंच!"


(त्यानंतर सर्व गांवकरी सरपंचाच्या घरी जमतात व आपापल्या जमिनीबद्दलची पूर्ण माहिती तहसिलदारांना देतात).
"मग काय, तहसिलदार साहेब, तुमचे काम झाले ना?
"होय, धन्यवाद सरपंच.
बरं तर, आता आम्ही निघतो. तुम्हाला काही दिवसानंतर परत भेटू. आम्हाला इतर काही गावांमध्ये जायचे आहे व तिथेही काम करायचे आहे. साधारण महिनाभराने आपण भेटू".
"होय चालेल, तुमच्या कामाला आमच्या शुभेच्छा!"
(त्यानंतर एक महिन्याने बरेचसे अधिकारी गावात येतात व ते सर्वजण सरपंचाच्या घरी जमतात).
"रामराम सरपंच. कसे आहात तुम्ही?"
"नमस्कार साहेब. या या बसा. तुम्हा सर्वांना पाहून मला खूप आनंद झाला आहे. आम्ही तुमच्यासाठी काय करू शकतो हे आम्हाला सांगावे"


"सरपंचसाहेब. आम्ही तुमच्या गावकऱ्यांच्या जमिनीबद्दलची पूर्ण माहिती मिळवली आहे आणि त्या महितीच्या आधारे सगळ्यांची भरपाई ठरवली गेली आहे. आता आम्ही तुम्हाला जमिनीसाठी योग्य ती भरपाई देऊ म्हणजे कायद्याची प्रक्रिया लवकरात लवकर पूर्ण होईल आणि काम सुरू करता येईल".
"अरे वा! ही तर खूपच चांगली बातमी आहे. तुम्हाला तुमच्या पध्दतीने जे करायला हवे आहे, त्यासाठी आम्ही सर्व लोक तयार आहोत".
"सरपंचसाहेब, अण्विक उर्जा विभागाच्या वतीने, आम्ही तुमचे व तुमच्या गावातील सर्व रहिवाश्यांचे खूप आभार मानतो. या सर्व लोकांनी सरकारच्या प्रकल्पाला मदत करून खूप शहाणपणा दाखवला आहे. मी तुमच्या सर्वांचे अभिनंदन करतो".
"आम्ही थोड्याच दिवसांत कामाला सुरूवात करू. सर्व गावकऱ्यांना नम्र विनंती आहे की त्यांनी प्रकल्पाच्या उद्‌घाटन समारंभाला हजर रहावे म्हणजे आपल्या देशाच्या प्रगतीमध्ये तुम्हाला सहभागी होता येईल".
(त्यानंतर अण्विक उर्जा विभागातील अधिकाऱ्यांकडून जिल्हा दंडाधिकाऱ्यांच्या हस्ते योग्य त्या भरपाईच्या रकमेचे चेक सर्व गावकऱ्यांना दिले जातात".)
"का नाही साहेब? आम्ही सर्वजण नक्की येऊ. गणपत, तुझे म्हणणे काय आहे?"
हो, सरपंच. ही आपल्या सर्वांना अभिमानाची गोष्ट आहे. आम्ही सर्वजण तिथे हजर राहू." (भरपाईच्या रकमेचे चेक वाटल्यानंतर, सर्व अधिकारी निघून जातात व काही दिवसानंतर कामाच्या जागेवर (साईटवर) काम सुरू होते.


साईटवरचे दृष्य:
(सर्व लोक, अधिकारी, मजूर, गावकरी आणि मोठ्या क्रेन्स, विटा, दगडे वाळू, लोखंडी सळया इ.)





या या सर्वजण, तुमच्या सर्वांचे या साईटवर स्वागत आहे. सरपंच साहेब, आमची अशी इच्छा आहे की या बांधकामाच्या जागेचा पहिला दगड legcne सर्वांकडून बसवला जावा.
होय साहेब! तुम्ही असे केल्यास आम्ही स्वत:ला भाग्यवान समजू. ये गणपत, सर्व गावकऱ्यांच्या वतीने पहिला दगड तू बसव.
अरे नाही नाही! मी तसे करू शकत नाही...
अहो काका, तुम्ही असे मागे फिरू नका, काहीही होणार नाही. तुमच्यासाठी ही केवढी आनंदाची आणि अभिमानाची गोष्ट ठरेल.
(समीरचे बोलणे ऐकून गणपत त्या गोष्टीसाठी तयार होतो व तो दगड बसवण्यासाठी जाऊ लागतो तितक्यात कुणीतरी मोठ्या आवाजात म्हणते, "थांबा. हे काम थांबवा, कुठलेही काम केले जाणार नाही. तुम्ही सर्व जण येथून निघून जा".)


अरे नथू, लखन, डमरू! तुम्ही आज शिकारपूरहून इथे असे अचानक कसे आलात? आणि एवढा गोंधळ का करता आहात?
गणपत भाऊ, हे बरोबर नाही आम्ही हा अणुवीज केंद्र इथे उभारला जाऊ देणार नाही.
हो गणपत, इथे कुठलाही अणुवीज केंद्र उभा केला जाऊ देणार नाही. त्यासाठी आम्हाला आमचे प्राण गमवावे लागले तरी हरकत नाही.
होय होय... जर इथे कुठलाही अणुवीज केंद्र उभारण्यात आला तर किरणोत्सर्गामुळे आमच्या शेतीला, धान्याच्या कोठारांना, घरांना आणि सगळ्यांनाच धोका निर्माण होईल. आणि आपण सर्वजण किरणोत्सर्गामुळे होणाऱ्या कर्करोग किंवा इतर रोगांना बळी पडू.
होय होय... आपण सगळेच जण मरून जाऊ... इथे कुठलेही काम केले जाणार नाही..तुम्ही सगळे जण इथून निघून जा..
भाऊ, जरा शांत हो... खरेच असे काही होणार नाही... हा सर्व तुमचा अंधविश्वास आहे...


चले जाओ...
चले जाओ...
त्यानंतर अणुउर्जेबद्दल वेगळया दृष्टीकोनातून विचार करत असलेली एक व्यक्ती पुढे येते व सरपंचावर ओरडते.
सरपंच, तुम्ही गप्प बसा ! मी सुध्दा या भागाचाच रहिवासी आहे.. तुम्हाला या सर्व गोष्टींबद्दल काय माहित आहे...? तुम्ही सर्व जण अज्ञानी, अडाणी, बालबुध्दी असणारे लोक आहात... तुम्हाला या सर्व गोष्टींबद्दल काही माहित आहे का? अणुवीज केंद्रातून होणारे किरणोत्सर्जन किती हानीकारक असू शकते ते तुम्हाला काय माहिती...?
त्यानंतर काही समाज कल्याण संस्थांमधील लोकही पुढे येतात.
तो म्हणतो ते अगदी बरोबर आहे.. आम्हाला वीज नको आहे.. आमचा पूर्ण गाव किरणोत्सर्जनामुळे नष्ट होऊन जाईल त्याचे काय?.. आमचा सर्वांचा या गोष्टीला पूर्ण विरोध आहे. हो की नाही भाऊ..?
चले जाओ...
चले जाओ...
होय होय, का नाही? काहीही होऊ दे... आम्ही तो अणुशक्ती प्रकल्प इथे उभारू देणार नाही.. उद्यापासून, आम्ही सर्व जण इथे निषेध दाखवण्यासाठी बसून राहू.
कृपा करून जरा शांत व्हा.. मी काय म्हणतो ते काळजीपूर्वक ऐका... आणि जरा शांततेने वागा.
मित्रांनो, तुमच्या बोलण्यावरून असे वाटते आहे की या लोकांनी आणि समाज कल्याण संस्थांमधील लोकांनी तुम्हाला बरोबर माहिती दिली नसावी... म्हणूनच त्यांच्या बोलण्याने चिथावून जाऊन तुम्ही सर्वजण इथे विरोध करायला जमलेले आहात. लखन काका मी तुम्हाला विचारतो.. तुम्हाला किरणोत्सर्जनाबद्दल काय माहिती आहे?
नथू काका... अणुवीज केंद्राच्या हानीकारक परीणामांबद्दल तुम्हाला काय माहिती आहे?
आणि डमरू तू... तू इथे तुझा अभ्यास सोडून त्यांच्याबरोबर निषेध व्यक्त करायला आला आहेस... तू विज्ञान शाखेचा विद्यार्थी आहेस... तुझ्या तोंडून असे काही ऐकायला चांगले वाटत नाही.


गप्प बस मुला.
तुझ्या अशा भूलथापांना कोणीही फसणार नाही...
जा इथून दूर निघून..
होय होय ! या लोकांना अणुवीज केंद्र नको आहे... तुम्ही त्यांना अडवू नका.
आमच्या कल्याणाचा विचार करणारे तुम्ही कोण आहात? हे आमचे आणि त्यांचे गाव आहे. काय बरोबर आहे आणि काय चूक याचा निर्णय त्यांनाच घेऊ दे. गेले कित्येक वर्षे तुम्ही गोड गोड बोलून लोकांना चुकीचे मार्गदर्शन केले आणि विकासाच्या मार्गांत अडथळा आणलात... त्याचा परीणाम म्हणून आपण सर्व आजपर्यंत मागासलेले राहिलो आहोत.
आणि लखन काका, तुम्ही विरोध करत आहात.. पण तुम्हाला माहित नाही का, की मागच्या वर्षी काकूंचा कर्करोग, शहरांत जाऊन घेतलेल्या किरणोत्सर्जन उपचारांमुळेच बरा झाला. आज काकू आरोग्यपूर्ण जीवन जगत आहेत ते केवळ किरणोत्सर्जन उपचारांमुळेच !
आणि नथू काका, जर एक्स रे मशीन (क्ष किरण यंत्रे) अस्तित्वात नसती तर दोन वर्षांपूर्वी तुमच्या पायांतल्या हाडाला पडलेली चीर (फ्रॅक्चर) कुणाच्याच लक्षात आली नसती. त्यावेळी जर तुम्हाला योग्य उपचार झाले नसते तर आज तुम्ही इथे उभे राहू शकला असता का?
आजही खेड्यांमधून हजारो लोक वेळेवर औषधोपचार न मिळाल्यामुळे मृत्यूमुखी पडतात.




खेड्यात चांगल्या शिक्षणाची सोय नसल्यामुळे हजारो मुले अशिक्षित रहातात आणि त्यामुळे आयुष्यात काही करू शकत नाहीत.

आजही हजारो लोक, अतिसारासारख्या गंभीर आजाराला बळी पडत आहेत याचे कारण आपल्या खेड्यांतून पिण्याच्या पाण्याची योग्य व्यवस्था केलेली नसते.... आणि ते आपला प्राण गमवतात. पक्क्या रस्त्यांची व गटारांची सोय नसल्यामुळे आजही पावसाचे पाणी आपल्या घरात घुसते... शेकडो लोक कॉलरा, मलेरिया सारख्या आजारांमुळे मरण पावतात.

आजपर्यंत कोणीही या कडे लक्ष दिले नाही.... गेली ६०–६५ वर्षे आपल्याला याच वृत्तीमुळे त्रास सहन करावा लागत आहे.. जेव्हा जेव्हा गावाच्या विकासाबाबत चर्चा होते.. जेव्हा जेव्हा एखादा आशेचा किरण दिसतो.. तेव्हा तुमच्यासारखे लोक व सामाजिक संस्थांमधले लोक इथे पोहोचतात आणि आपले पाय रोवतात.. लोकांना चुकीचे समज करून देतात.

मी तुम्हाला विचारतो की इतक्या वर्षांत तुम्हाला काय मिळाले.. जरा स्वत:कडेच पहा.. तुमची परिस्थिती काय आहे.. गावात वीज नाही.. मुले अभ्यास करू शकत नाहीत.. रात्रीच्या वेळी अन्न शिजवता येत नाही.. शेतातल्या पिकांवर जलसिंचन करता येत नाही... गरीबीमुळे तुम्हाला चांगल्या दर्जाचे बी–बियाणे आणि शास्त्रशुध्द साधने विकत घेता येत नाहीत.... हाच का तो तुम्हाला हवा असलेला विकास? काय तुमच्या मुलांसाठी तुम्ही हीच स्वप्ने रंगवली आहेत..? आज जेव्हा इथे कोणीतरी तुमच्या विकासासाठी आले तेव्हा तुम्ही त्यांना विरोध करायला पुढे आलातं.

असा विरोध करून तुम्हाला काय मिळणार आहे? तुमच्या मुलांच्या भविष्याबाबत थोडासा बारकाईने विचार करा... आज सारे जग चंद्रावर रहायला जाण्याच्या विचार करते आहे आणि आपण जगदिशपूर व शिकारपूरमधील लोक पृथ्वीवर चांगल्या रितीने जीवन का जगू शकत नाही? तुम्हाला असे वाटत नाही का की आपण सर्वजण ह्याला जबाबदार आहोत?






तुझे तोंड बंद कर, मुला. तुझ्यासारखे कित्येक जण पाहिले आहेत.. तुझ्या या अशा बडबडीने काहीही होणार नाही. आम्ही या गावाचा विकास करू. आम्ही तुम्हाला या गावांच्या विकासाचे व भरभराटीचे वचन देतो.

लोकांना वचन नको आहे, काम हवं आहे.
जर हे जग फक्त वचनांवर चालवता आलं असतं तर ते सोपं होतं मी तुम्हाला विचारतो की गेल्या ६०-६५ वर्षांमध्ये तुम्ही आमच्यासाठी काय केलं?... दरवेळी तुम्ही फक्त वचनं देता आणि लोकांना चुकीची माहिती देऊन विकासाच्या कामांत अडथळा आणता.

आणि एका मोठ्या उद्योजकाकडून इथे सुरू होणाऱ्या कापड उद्योगालासुध्दा तुम्ही लोकांनीच नकार दिला.





त्यावेळी सुध्दा तुम्ही लोकांना चुकीची माहिती देणारी भाषणे केली होती. आज जर तो कापड उद्योग इथे असता तर तिथे कितीतरी लोकांना नोकरी मिळाली नसती का? आज आपल्या सर्व गावकऱ्यांचे राहणीमान सुधारले असते. तुमच्या विरोधामुळे आज तो कारखाना दुसऱ्या गावांत उभा आहे. जरा त्या गावांत जाऊन त्या लोकांची परिस्थिती पहा. त्या गावांचे जणू नशीबच पालटले आहे.

म्हणूनच, विकास आणि भरभराट यासारखे शब्द तुमच्या तोंडात शोभत नाहीत. आज गावकरी जागृत झाले आहेत. अशा वेळी तुम्ही आम्हाला मूर्ख बनवू शकत नाही.








तू व तुझे साथीदार आणि या सामाजिक संस्थामधले लोक इथून निघून गेलात तर बरे होईल.. नाहीतर त्याचा काहीतरी वाईट परीणाम होऊ शकेल.. हो की नाही, बंधूंनो?.. होय होय.. तुम्ही सर्वजण इथून निघून जा.

(लोकांना संतापलेले पाहून, अणुऊर्जेबाबत वेगळ्या दृष्टीकोनातून विचार करणारे लोक व सामाजिक संस्थामधले लोक एक एक करून तिथून निघून जातात...)



आणि लखन काका, अणुऊर्जेबाबत एक गोष्ट मला स्पष्ट केलीच पाहिजे. ती म्हणजे अणुवीज केंद्रातून किरणोत्सार होत नाही. प्रकल्पाद्वारे अतिशय कमी खर्चात वीज निर्माण करता येते आणि ती आरोग्याला हितकारी असते. त्याशिवाय आजुबाजूचे वातावरणही स्वच्छ व सुंदर बनते आणि मी हे सारे काही उगाच सांगत नाही. काही दिवसांपूर्वी... आम्ही सर्वजण तारापूर अणुवीज केंद्राला भेट द्यायला गेलो होतो तेव्हा आम्ही तिथे आमच्या डोळ्यांनी स्वत: पाहिले आहे.. म्हणूनच तुम्ही सर्वांनी मनावरचे दडपण काढून टाका. सगळे काही ठीक होईल. हो की नाही गणपत काका?



होय लखन. समीर खरं तेच सांगतो आहे.. काही महिन्यांपूर्वी आम्ही सर्वच जण अज्ञान व अंधविश्वासामुळे, इतर गावकऱ्यांप्रमाणे तुमच्यासारखेच बोलत होतो. समीरला देवाचे खूप आशीर्वाद लाभू देत, त्याने खरोखरच आपले डोळे उघडले आहेत.

छान बोललास, गणपत, प्रत्येक गावाला समीर सारखा एखादा मुलगा मिळाला पाहिजे जो साऱ्यांचे डोळे उघडू शकेल. छान केलसं, मुला... दीर्घायू हो..

(त्यानंतर शिकारपूर गावातील लोक तिथून निघून जातात.)





वा! समीर आम्हाला तुझा अभिमान वाटतो. तू हा प्रश्न खूप नीटपणे हाताळलास. तुझे खरोखरचं अभिनंदन केले पाहिजे.

त्यानंतर गणपत पहिला दगड बसवतो आणि मग सगळे जण टाळ्या वाजवतात आणि एकमेकांचे आभार मानून मिठाई वाटतात... आणि मग काही वर्षांत हळूहळू अणुवीज केंद्र उभा रहातो.



## एक वर्षांनंतर






दोन
वर्षानंतर



तीन
वर्षानंतर











चार
वर्षांनंतर


पाच
वर्षांनंतर

(आणि पाच वर्षांनंतर तारापूर गावांत अणुवीज केंद्र उभा रहातो व त्याच्या उद्घाटनाचा दिवसही उजाडतो... त्या दिवशी सर्व गांवकरी उद्घाटन समारंभासाठी हजर रहातात.




जगदीशपुर परमाणु


विद्यूत घर




तुम्हा सर्व गावकऱ्यांचे हार्दिक स्वागत आहे. सुरवातीला इतका विरोध होऊनही, तुमच्या शहाणपणा व समजूतदारपणामुळेच या गावांत अणुवीज केंद्र उभा राहू शकला व त्याबद्दल तुमच्या सर्वांचे अभिनंदन, खासकरून समीरजींचे!



अरे, या अणुवीज केंद्रामुळे गावाचा विकास होऊन त्याची भरभराट होईल ही आपल्या सर्वांसाठी फार आनंदाची गोष्ट आहे. आता आपल्या गावांत नेहमीच वीज उपलब्ध असेल. या साठी आम्ही सर्व लोक आपल्या सर्वांचे खूप आभारी आहोत.



(त्यानंतर सरपंच उद्घाटनासाठीची फीत कापतात आणि सर्व लोक आनंदाने अणुवीज केंद्रांत प्रवेश करतात.)


जगदीशपुर परमाणू विद्यूत घर



(आणि त्या नंतर, एके दिवशी गावांतही इमारतींचे बांधकाम सुरू होते आणि दोन वर्षांच्या कालावधीत जगदिशपूर गावाचा पूर्ण कायापालट होतो.)
सामूहिक केंद्राची उभारणी (कम्युनिटी सेंटर)
सामुदायिक केन्द्र


शाळेच्या इमारतीची बांधणी
जगदीशपुर विद्यालय


रूग्णालय
उभे केले...
दवाखाना


आणि एके दिवशी
बाबा, मला अणुवीज केंद्रामध्ये नोकरी मिळाली आहे..


काय? हे तू काय सांगतो आहेस? ही तर खरचं खूप चांगली बातमी आहे. मी आता सगळ्यांना ही बातमी देतो.. (ह्याचप्रकारे जगदिशपूर अणुवीज केंद्रामध्ये बऱ्याच जणांना त्यांच्या शैक्षणिक पातळीनुसार नोकऱ्या मिळाल्या...)


(आणखी काही वर्षांनी गावाची सर्व बाजूंनी
भरभराट झाली आणि लोकांच्या आनंदाला
सीमा राहिली नाही.. ही सर्व भरभराट आणि
गावांचा होणारा विकास पाहून लोकांच्या
डोळ्यांतून आनंदाश्रू वाहू लागले..
गावकऱ्यांचे राहणीमानही खूप सुधारले.)
आणि शेवटि

# काही वर्षांनंतर....



वा गणपत काका! तुम्ही पूर्णपणे बदलला आहात की.. नवीन शर्ट नवीन पॅंट, नवीन मोटार, व्वा ! काय थाटमाट..!

वा लक्ष्मी मावशी, तुमचे घर गवताचे छप्पर असलेले होते ना? आज ते किती megboj दिसते आहे.. वा गंगु मावशी, आता तुम्ही या गावातल्या जीवनांचा आनंद घेत आहात ना?.....

रघुकाका, तुमचे काय ?... तुम्ही खूष आहात ना?












तर अशा रितीने जगदिशपूर गाव थोड्याच कालावधीत एक विकसित गाव बनले व त्याची भरभराट झाली व इतर गावांना त्यापासून प्रेरणा मिळाली.

समाप्त!

- मित्रांनो, तुम्ही हे पाहिले असेल की आजही भारताच्या प्रत्येक कानाकोपऱ्यांत गणपत आणि जगदिशपूर सारखी गावे अस्थित्वांत आहेत जिथे अजूनही अज्ञान व अंधविश्वासाचे साम्राज्य आहे. या गोष्टीवरून बोध घेऊन लोकांनी सध्याच्या काळाची गरज ओळखली पाहिजे आणि हा दृढनिश्चय केला पाहिजे की आम्ही प्रगती पथावर चालून आपल्या देशाची भरभराट करू...

- इतिहास या गोष्टींची साक्ष देतो की जेव्हाजेव्हा कोणी एखाद्या नवीन गोष्टीचा शोध लावला, तेव्हातेव्हा त्या व्यक्तीला लोकांच्या टीकेला सामोर जावे लागले, मग तो न्यूटन असो वा आईनस्टाईन, जेम्स वॅट असो वा थॉमस अल्वा एडिसन. सुरूवातीला सर्वांनीच त्यांना हसून त्यांना नाऊमेद केले. पण त्यांनी प्रत्येक आव्हान सकारात्मकरित्या पेलले आणि त्यांनी जगाला दिलेल्या आगळ्या भेटवस्तूंमुळे आज जग पूर्ण बदललेले दिसते. म्हणूनच आपण त्यांच्याकडून प्रेरणा घेतली पाहिजे म्हणजेच आपण त्यांच्या पावलांवर पावले टाकून पुढे जाऊ शकू.

आणि मित्रांनो,

- जर तुम्हाला विरोध करायचाच असेल, तर अज्ञानाला, अंधविश्वासाला विरोध करा, सनातनीपणाला, अन्यायाला विरोध करा पण प्रगतीला, विकासाला आणि भरभराटीला विरोध करू नका.

- आता आपण अशी एक शपथ घेऊया जी आपण कुठल्याही परिस्थितीत मोडणार नाही... ती म्हणजे काहीही झालेतरी... आपण मागेपुढे न पहाता आपल्या देशाच्या विकासाचा मार्ग खुला करून देऊ..

- आता मी दुसऱ्या एखाद्या अशा गावांत निघालो आहे. तिथल्या एखाद्या गणपतला आणि त्याच्या सारख्या गावकऱ्यांना योग्य मार्ग दाखवायला...

## आणि आता तुमची वेळ आहे...

## जय हिंद

**“ अणु ऊर्जा... देशाची ऊर्जा**
**स्वच्छ ऊर्जा... स्वच्छ भारत ”**



एनपीसीआईएल
NPCIL

## न्यूक्लिअर पॉवर कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लिमिटेड
**(भारत सरकारचा उपक्रम)**

द्वारा
लोकहितार्थ प्रसिद्ध

यांच्याद्वारे प्रकाशित केले:
कॉर्पोरेट प्लॅनिंग आणि कॉर्पोरेट कम्युनिकेशन संचालनालय (सीपी आणि सीसी)
६–एस–१४, विक्रम साराभाई भवन, अणुशक्तीनगर, मुंबई – ४०० ०९४
ई मेल: cpcc@npcil.co.in
वेबसाईट : www.npcil.nic.in